# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१

## प्रसिध्दीपत्रक

**संदर्भ :-** प्राचार्य, सैनिकी शाळा, सातारा यांचे पत्र क्र. NO. ५४५/S/EST/२०१८-१९/९५४, दि. ३०/०१/२०१९.

परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दिनांक २४/०२/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. संदर्भीय पत्रान्वये अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षा ही सुध्दा दि. २४/०२/२०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

उपरोक्त दोन्ही परीक्षा एकाच दिवशी येत असल्याने विद्यार्थ्यांना दोन्ही परीक्षा देता याव्यात याकरीता पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) **दि. २४/०२/२०१९ या दिवशीच होईल. तथापि परीक्षेच्या वेळेत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.**

| दिनांक | पेपर क्र. | वेळ |
|---|---|---|
| २४/०२/२०१९ | पेपर क्र. १ | दु. ०१.०० ते दु. ०२.३० |
| | पेपर क्र. २ | दु. ०३.३० ते सायं. ०५.०० |

शिष्यवृत्ती परीक्षा व अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षा या दोन्ही परीक्षेस प्रविष्ट परीक्षार्थ्यांची परीक्षा त्यांचे मूळ परीक्षा केंद्र (शिष्यवृत्ती परीक्षेचे) व अखिल भारतीय सैनिकी शाळा प्रवेश पुनर्परीक्षेचे परीक्षा केंद्र अशा दोन्ही परीक्षा केंद्रांवर घेण्याची व्यवस्था परीक्षा परिषदेकडून करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षार्थ्यांनी त्यांच्या सोयीनुसार दोन्हीपैकी एका परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्राच्या दोन प्रतींसह परीक्षेस उपस्थित राहून परीक्षा द्यावी. तरी सदर बदलाबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

दिनांक ०५/०२/२०१९